सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ५३

# आदिवासी लोकसंख्या गटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील गळतीचा मूल्यमापन अहवाल

*


**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**

महाराष्ट्र राज्य

२८, राणीचा बाग, पुणे ४११००१.

१९८७

68

# आदिवासी लोकसंख्या गटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील गळतीचा मूल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
२८, राणीचा बाग, पुणे-४११००१.

## - प्रस्तावना -

राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण फार मोठे आहे असे अंदाज समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे. सदर गळतीची कारणमिमांसा करून त्यावर काही उपाययोजना सुचविण्याच्या संबंधात मूल्यमापन पाहणी करून अभ्यास अहवाल तयार करावा असे अंदाज समितीने सुचविले आहे.

त्यानुसार ह्या संस्थेने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील निवडक तालुक्यात सर्वेक्षण करून त्या विभागातील शिक्षक/पालक व लोकप्रतिनिधी ह्यांचे गळती बाबतचे विचार/मते जाणून घेऊन सोबतचा निष्कर्ष अहवाल तयार केला आहे.

सदर अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्री. दि.स. महाजन, सांख्यिकी अधिकारी ह्यांनी श्री. सो. रा. शेवकरी, संशोधन सहाय्यक ह्यांच्या मदतीने माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

आदिवासी विभागातील शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना हा अभ्यास अहवाल मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल अशी मला खात्री वाटते.

[डॉ. गोविंद गारे]<br>
संचालक,<br>
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

## - अनुक्रमणिका -


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक पासून | पृष्ठ क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|
| १] प्रकरण [१] | मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे आणि सर्वेक्षण पध्दती. | १ | ६ |
| २] प्रकरण [२] | आदिवासींचे शिक्षण एक दृष्टिक्षेप. | ७ | १२ |
| ३] प्रकरण [३] | आदिवासी क्षेत्रातील शैक्षणिक स्थितीचा आढावा. | १३ | १९ |
| ४] प्रकरण [४] | जव्हार तालुक्यातील आदिवासी मुलांच्या शाळेतील गळतीचा अभ्यास. | २० | २७ |
| ५] प्रकरण [५] | आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळतीची कारण-मिमांसा. | २८ | ३२ |
| ६] प्रकरण [६] | शिक्षणातील गळती कमी करण्यासाठी उपाययोजना. | ३३ | ३८ |
| | .... | | |
| ७] परिशिष्ट [१] | प्रपत्र [१] - कुटुंब पत्रक | १ | २ |
| ८] परिशिष्ट [२] | प्रपत्र [२] - प्रशासकीय अधिका-यांच्या/सामाजिक कार्यकर्त्यांच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली. | ३ | |
| ९] परिशिष्ट [३] | प्रपत्र [३] - गांव माहिती | ४ | ८ |
| १०] परिशिष्ट [४] | प्रपत्र [४] - तालुका सांख्यिकी माहिती. | ९ | १३ |

## प्रकरण [१]

## मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे आणि सर्वेक्षण पध्दती

### १.१ मूल्यमापन अभ्यास पार्श्वभूमी :

शिक्षण विभागाशी संबंधित योजना व कार्यक्रम यांचेसाठी आंतरविभागीय संनियंत्रण साधण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीची बैठक मा. सचिव, शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई हयांचे अध्यक्षतेखाली दि. १५-१०-८६ रोजी झाली. त्या बैठकीमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील गळतीबाबत चर्चा झाली. त्यामध्ये असे सांगण्यात आले की, अंदाज समितीच्या अहवालात/अभिप्रायात असे नमूद करण्यात आले आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये गळतीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. तरी त्याची कारणे व उपाययोजना सुचविणारा मूल्यमापन अहवाल तयार करुन तो शासनास सादर करावा.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेने १९६५-६६ साली हयाबाबत एक अहवाल तयार केल्याने माननीय सचिवांनी हे काम जरी शिक्षण खात्याचे असले तरी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने हयाबाबत एक अहवाल तयार करुन सादर करावा असे सांगितले. त्यासाठी खालील अधिका-यांची समिती नियुक्त करण्यात आली.

[१] संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, पुणे-३०.

[२] संचालक, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

[३] संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१.

मूल्यमापन अहवालाचे काम तीन गटात विभागून करावयाचे ठरले.

[१] आदिवासी गट

[२] अनुसूचित जातीचा गट

[३] सर्वसाधारण गट

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ही नोडल एजन्सी म्हणून काम पाहणार असल्याचे ठरल्याने संस्थेने संबंधित विभागातील अधिका-यांच्या बैठकी बोलावून विषयाबाबत चर्चा करून मूल्यमापन अहवालाची उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत. क्षेत्रीय पाहणी संदर्भात जिल्हा/तालुका/गांव व शाळा निवडीसाठी कोणती पध्दत निवडावी व क्षेत्रीय पाहणीसाठी प्रश्नावली तयार करुन घेणेबाबत सर्वांची मते विचारात घेऊन प्रश्नावली तयार केली व क्षेत्रीय पहाणीचे काम संबंधित गटाने पूर्ण केले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळेतील गळतीचे प्रमाण तपासण्याचे काम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हयांनी हाती घेऊन पूर्ण केले आहे. जर अनुसूचित जाती व इतर लोकसंख्या गटाच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण तपासण्याचे काम अनुक्रमे समाजकल्याण विभाग, पुणे व शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था शिक्षण विभाग, पुणे हयांनी पार पाडले आहे.

१.२. <u>मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे</u> -

मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी खालील उद्दिष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली आहेत.

१. सर्वसाधारण लोकसंख्येच्या अनुषांगाने व वैयक्तीकरित्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर लोकसंख्या गटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण शोधून काढणे.
२. शिक्षणातील गळतीची विविध कारणे तपासणे, गळतीच्या कारणांची मिमांसा करणे.
३. शिक्षणातील गळती थांबवण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

१.३ गळतीची पहाणी करण्यासाठी तीन गटात/विभागांत सर्वेक्षण करण्याचे योजिले त्यांत अनुसूचित जमातींचे क्षेत्र, अनुसूचित जातीचे क्षेत्र व सर्वसाधारण विभाग अशी निवड करण्यांत आली. त्यात [अ] आदिवासी जमातीसाठी क्षेत्र/विभाग निवडतांना असे ठरविण्यांत आले की, बहुसंख्य आदिवासी लोकसंख्या असलेल्या ठाणे जिल्हयातील जव्हार तालुका निवडावा [ब] अनुसूचित जातीची मोठी संख्या असलेला विदर्भ व मराठवाडा हयांच्या सरहद्दीवरील बुलढाणा जिल्हयातील मेहेकर तालुका निवडण्यात आला तर [क] इतर लोकसंख्येच्या गटासाठी पुणे जिल्हयातील दौंड तालुका निवडला.

१.४ <u>गांव-शाळा निवड</u> :

ग्रामीण विभागातील विभागवार प्रत्येक तालुक्यातून एकूण तीन गांवे निवडली असून त्या गावामधील शाळेची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. शाळांची निवड करतांना प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्गांचा विचार केला आहे. सर्वेक्षणासाठी गावांची निवड करतांना [१] एक गाव रस्त्यालगतचे घेतले असून [२] एक गांव रस्त्यापासून दूर असलेले तर [३] एक गांव अति दुर्गम भागातले घेतले आहे. या मागील उद्देश हा की पहाणी निष्कर्ष सर्वकष स्वरूपाचे असावेत व गावातील परिसराचा शिक्षणावर काय परिणाम होतो हे स्पष्ट व्हावे. गांवे निवडतांना त्या गावात १ ते ४ किंवा १ ते ७ व १ ते १० इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय असलेली गांवे निवडली आहेत.

१.५ <u>नागरी विभाग - गाव-शाळा निवड</u> :

[१] नागरी विभागातील नगरपालिकेच्या अखत्यारीत असलेली एक व [२] अनुदानीत खाजगी संस्थेची एक अशा शाळा सर्वेक्षणातील निवडल्या आहेत. त्यानुसार जव्हार तालुक्यातील जव्हार व मेहेकर तालुक्यातील मेहेकर नगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या शाळेतून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे.

१.६. थोडक्यात निवड करण्यात आलेल्या क्षेत्र/विभाग/जिल्हा/गावांची एकत्रितरित्या माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | तालुका | निवडलेली गांवे/नगरपरिषादा. |
|---|---|---|---|---|
| १. | अ] ग्रामीण विभाग | | | |
| | आदिवासी जमात गट | ठाणे | जव्हार | १. विक्रमगड<br>२. गोरठण<br>३. गरदवाडी |
| २. | अनुसूचित जमाती गट | बुलढाणा | मेहेकर | १. देऊळगाव साकरसा<br>२. घाटबोरी<br>३. डुग बोरी |
| ३. | इतर लोकसंख्या गट | पुणे | दौंड | १. गोपाळवाडी<br>२. आलेगाव<br>३. रावणगाव |
| | ब] नागरी विभाग | ठाणे | जव्हार | जव्हार नगर परिषद |
| | | बुलढाणा | मेहेकर | मेहेकर नगर परिषद |

१.७. पहाणीचे संदर्भ वर्ष :

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण १ ते ४, १ ते ७ व १ ते १० ह्या विभागात करावयाचे असल्याने सन १९८६ हे संदर्भ वर्ष धरून मागील अनुक्रमे ४, ७ व १० वर्षाचे दप्तर तपासून गळती झालेल्या मुलांची यादी तयार केली. यामध्ये सध्या ४, ७ व १० वी ह्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यांचा गट विचारात घेऊन त्यांचे मागील रेकॉर्ड तपासण्यांत आले व त्या नोंदीचा पहाणीत उपयोग करण्यांत आला.

गळती झालेल्या मुलांची यादी करणेसाठी कोणत्या वर्षापासून यादी करावयाची हे ठरवले ते खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निवडलेल्या शाळा | वर्ग | संदर्भ वर्ष |
|---|---|---|---|
| १. | १ ली ते ४ थी | पहिली | १९८२-८३ |
| २. | १ ली ते ७ वी | पहिली | १९७९-८० |
| ३. | ५ वी ते १० वी | पाचवी | १९८०-८१ |

१.८. <u>गळती झालेल्या मुलांची यादी करण्यासाठी ठरवलेली तत्वे</u> :

प्रथम वर्गातील सर्व मुलांची-मुलींची यादी करून वर्गवार हजेरी पट तपासला. सध्या शिकत असलेल्या मुलांपुढे [✓] ही खूण करून ते बाजूला काढले. नंतर नापास झालेल्या मुलांपुढे तसे शेरे देऊन उरलेल्या गळती झालेल्या मुलांची यादी तयार करण्यात आली. अशारितीने तयार झालेल्या यादीतून तिन्ही गावातून कमीत कमी ५० व जास्तीत जास्त १०० मुलांची निवड केली. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांशी संपर्क साधून कुटुंब पत्रिकेमध्ये त्यांची आवश्यक ती माहिती गोळा करण्यात आली.

१.९. <u>पाहणीत भरावयाची पत्रके</u> :

क्षेत्रीय पहाणीसाठी तालुका, गाव व कुटुंब स्तरावरील माहिती गोळा करण्यासाठी व प्रशासकीय अधिका-याचे अभिप्राय गोळा करण्यासाठी एक असे चार प्रकारची खालीलप्रमाणे पत्रके तयार करून त्यामध्ये माहिती गोळा केली आहे.

| पत्रक क्र. | विषय |
|---|---|
| १ | कुटुंबाचे पत्रक |
| २. | प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांचे अभिप्राय प्रश्नावली. |
| ३. | गावांची माहिती |
| ४. | तालुक्याची सांख्यिकी माहिती. |

पत्राक क्र. १

कुटुंब पत्राक -

ज्या मुलांची अगर मुलींची शाळेतून गळती झाली आहे अशा विद्यार्थ्यांच्या कुटुंबाशी संपर्क साधून ह्या पत्राकातील सर्व माहिती गोळा केली आहे.

पत्राक क्र. २

शासकिय/सार्वत्रिक अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली :

गावामध्ये अगर तालुक्यामध्ये शिक्षण क्षेत्रात काम केलेल्या, करत असलेल्या, अगर ज्याला शिक्षणाबाबत आस्था आहे अशा सामाजिक कार्यकर्त्यांकडून ही प्रश्नावली भरून घेतली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विभागामध्ये ज्या शिक्षकांनी बरीच वर्षे सेवा केली आहे अशा शिक्षकांकडून त्यांचे विचार व सूचना नोंदण्यासाठी या प्रश्नावलीचा उपयोग करून त्यामध्ये माहिती गोळा केली आहे.

पत्राक क्र. ३

गावाची माहिती

निवडलेल्या गावाची लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, प्राथमिक उपलब्ध असलेल्या सुविधा व शिक्षणाबाबतची आकडेवारी ह्या प्रश्नावलीत गोळा केली आहे.

पत्राक क्र. ४

तालुक्याची सांख्यिकी माहिती

या पत्राकामध्ये तालुक्याची शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यासाठी शाळांची माहिती गोळा केली आहे. त्यावरून त्या तालुक्यात शिक्षणाच्या कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत व त्यामध्ये किती विद्यार्थी समाविष्ट केले जातात इत्यादी बाबींवर माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील सर्व पत्राके निवडलेल्या कुटुंबासाठी, गावासाठी व तालुक्यासाठी भरून घेतली आहेत.

.....

## प्रकरण- २ रे

## आदिवासींचे शिक्षण : एक दृष्टीक्षेप

२.१. सार्वजनिक प्राथमिक शिक्षण तरतूद :

भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये ६ ते १४ वयाच्या मुलामुलींसाठी प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तथापि प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही. सार्वत्रिकरणाच्या बाबतीतला सर्वसाधारण अनुभव आणि त्याचेवरील संशोधनाचे निष्कर्ष पाहिले असता ६ ते ८ वयोगटातील मुले मोठ्या प्रमाणात शाळेत नोंदली जातात असे आढळते. परंतु त्यानंतर सुमारे ६० टक्के मुले/मुली शिक्षण अर्धवट सोडून जातात. त्यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक असते. ग्रामीण भागात आणि विशेषत: आदिवासी भागात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण फारच मागे पडले आहे. त्याची प्रमुख कारणे सामाजिक व आर्थिक स्वरूपाची आहेत.

२.२. आपली अर्थव्यवस्था व शिक्षण :

आपली अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीप्रधान आहे. जवळ जवळ ७० टक्के लोक शेतीवर आपली उपजिवीका करतात. त्यावर आपला चरितार्थ चालवतात. अन्नधान्य उत्पन्नाचे शेती हे एक प्रमुख साधन असल्याने शिक्षणाचा त्या संदर्भात विचार करणे आवश्यक वाटते. शैक्षणिक विकास व आर्थिक विकास हे एकमेकावर अवलंबून आहेत. आर्थिक विकासाशिवाय लोकांचे राहणीमान उंचावणार नाही किंवा सुधारणार नाही. आर्थिक साधनांचा पुरेपूर उपयोग करून घेण्याचे शिक्षण हे एक साधन आहे. तेव्हा शैक्षणिक विकासाशिवाय आर्थिक विकास किंवा सुधारणा यांना काहीही अर्थ नाही. कारण लोक सुशिक्षित नसतील तर आर्थिक विकासाचे फायदे आपल्या भल्यासाठी कसे वापरावयाचे हे त्यांना समजणार नाही.

शिक्षण व अर्थव्यवस्था ही एकमेकांना पुरक आहेत. केवळ तेथे मतप्रणाली, विचार पध्दती अगर जगाकडे पहाण्याचा दृष्टीकोन ह्यामध्ये थोडाफार फरक आढळून येईल. तेव्हा शिक्षण धोरण अर्थव्यवस्थेशी सुसंगत असावयास हवे. सर्वसाधारणपणे आदिवासी भागात मुले/मुली शाळेत न पाठविण्याच्या विविध कारणांपैकी काही कारणे आर्थिक स्वरुपाची आहेत. तर काही सामाजिक आहेत. श्री. व्हेरिअर एलविन यांनी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे ब-याच अडचणीचे आहे. आदिवासी कुटुंबांना आपला मुलगा शाळेत पाठवणे म्हणजे एक अर्थशास्त्रीय बाब वाटते. पूर्वीच्या श्रम विभागणीच्या तत्वावर त्याचा दुष्य परिणाम लगेच दिसून येतो. मुली आईला घरकामात हरप्रकारे मदत करतात तर मुले वडिलांना शेतीच्या हंगामात शेतीवर काम करुन मदत करतात. इतर वेळी गुरे सांभाळणे, जंगलातील लाकूडफाटा, गवत, फळे, कंदमुळे इत्यादि दुय्यम वस्तू गोळा करणे, पिकांची राखण करणे, शिकार करणे, मासे मारणे, पाणी आणणे, लहान मुलांना सांभाळणे इत्यादि अर्थप्राप्त करुन देणा-या गोष्टी करीत असतात.

अशा पार्श्वभूमीवर आदिवासी भागातील शिक्षणाचा मूलभूत प्रश्नाचे दोन-तीन ढोबळमानाने वर्गीकरण करता येईल.

१] सामाजिक व आर्थिक स्वरुपातील अडसर

२] विशिष्ट अनुसूचित जमातीतील वैचित्र्यानुसार अडसर

३] शालेय शिक्षण पध्दतीतील अंगभूत अंतर्गत अडसर किंवा नियंत्रक.

सर्वसाधारण शिक्षणाबाबत आदिवासींमध्ये कमालीची उदासिनता दिसून येते. मुलांची शाळेत नोंद झाल्यानंतर काही वर्षातच मुलांचे शिक्षण थांबते. त्याची विविध कारणे काय असतील याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे. तेव्हा

"आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळती" संबंधी मूल्यमापन करून आदिवासी मुलामुलींना शिक्षणासाठी उद्युक्त करणे व गळतीची कारणमिमांसा करणे क्रमप्राप्त ठरते.

आजच्या सद्यस्थितीत महाराष्ट्रातील एकुण विद्यार्थी व आदिवासी जमातीतील एकूण विद्यार्थी ह्याची माहिती देणे संयुक्तीक होईल.

<u>तक्ता क्र. १</u>

महाराष्ट्रातील एकूण व आदिवासी विद्यार्थी [१९८४-८५]

| प्राथमिक शाळेतील वर्ग | एकूण | | | आदिवासी जमात | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| पूर्व प्राथमिक | ३०५०० | २३५५१ | ५४०५१ | ५४०७ | ४७६८ | १०१७५ |
| १ | १२९३१२५ | ११३६७९८ | २४२९९२३ | १४२०८५ | १०७७८० | २४९८६५ |
| २ | १०६११५८ | ८९०७५५ | १९५१९१३ | १००३३० | ६६९९३ | १६७३२३ |
| ३ | १०२१६५० | ८१६८६२ | १८३८५१२ | ८३४७८ | ४८९७१ | १३२४४९ |
| ४ | ८३६९६८ | ६२३५४० | १४६०५०८ | ५६६३१ | २९२७० | ८५९०१ |
| ५ | ३७१२९४ | २६०७३२ | ६३२०२६ | २५७१२ | १०५५१ | ३६२६३ |
| ६ | २९१४०५ | १९५५६० | ४८६९६५ | १९१६१ | ७२०८ | २६३६९ |
| ७ | २३३८३८ | १४६९९९ | ३८०८३७ | १४४५६ | ५२७६ | १९७३२ |

संदर्भ :- सर्वसाधारण शिक्षणावरील सांख्यिकी माहिती [ऑगस्ट १९८६] शिक्षण संचालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र राज्यातील एकूण विद्यार्थी व आदिवासी विद्यार्थ्यांची माहिती वरील तक्त्यात दिली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी उपयोजना क्षेत्रात शिक्षणाची किती प्रगती झाली आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्रान्तर्गत वर्गनिहाय एकूण व स्तरनिहाय मुले/मुली

सन - १९८४-८५

| वर्ग | एकूण मुले | | | आदिवासी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| पूर्व प्राथमिक | १३३२४ | ७१०२ | ६२२२ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| १ | १८४८०८ | १०२२६४ | ८२५४४ | १०४२५९ | ५९७३४ | ४४५२५ |
| २ | १३१६२५ | ७६२५२ | ५५३७३ | ६९४९५ | ४२४६७ | २७०२ |
| ३ | १०८९९२ | ६५३२२ | ४३६७० | ५३६२३ | ३४७७७ | १८८४६ |
| ४ | ७४३६२ | ४६६०९ | २७७५३ | ३१७४३ | २२००८ | ९७३५ |
| ५ | ५८२६१ | ३७७८६ | २०४७५ | २२६१८ | १६४४९ | ६१६९ |
| ६ | ४६३६५ | ३०८६१ | १५५०४ | १७२८४ | १२८०७ | ४४७७ |
| ७ | ४१९१४ | २८२५५ | १३६५९ | १३८४७ | १०४९६ | ३३५१ |
| ८ | २६९४३ | १८८९८ | ८०४५ | ७९०२ | ६२७४ | १६२८ |
| ९ | २२५०० | १६२११ | ६२८९ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| १० | १५३२० | ११२४२ | ४०७८ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| १ ते ४ | ४९९७८७ | २९०४४७ | २०९३४० | २५९१२० | १५८९८६ | १००१३४ |
| ५ ते ७ | १४६५४० | ९६९०२ | ४९६३८ | ५३७४९ | ३९७५२ | १३९९७ |
| १ ते ७ | ६४६३२७ | ३८७३४९ | २५८९७८ | ३१२८६९ | १९८७३८ | ११४१३१ |
| ८ ते १० | ६४५६३ | ४६१५१ | १८४१२ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |

[ पान क्र. ७५]

* टिप- उ. ना. - उपलब्ध नाही.

संदर्भ : सर्व साधारण शिक्षणावरील सांख्यिकी माहिती [ऑगस्ट १९८६]

## तक्ता क्र. ३

## आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राथमिक शाळांची माहिती

| अनु. क्र. | बाब | सन १९८४-८५ तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एक शिक्षकी | निम्न प्राथमिक | उच्च प्राथमिक | एकूण |
| १. | संख्या<br>संख्या | ३७३४ | १६१५ | १०८७ | ६४३६ |
| २. | हजेरीपट<br>पटसंख्या | १३७१०८<br>[५७७२३] | १९४५३२<br>[८४८१४] | २५८९३८<br>[९८३५३] | ५९०५७८<br>[२४०८९०] |
| ३. | एकूण शिक्षक | ३७०२<br>[१२४] | ४८८६<br>[११२५] | ६९५२<br>[१५११] | १५५४०<br>[२७६०] |
| ४. | प्रशिक्षित<br>शिक्षक | २९२७<br>[७८] | ४३१८<br>[९९६] | ६१७३<br>[१५५२] | १३४१८<br>[२६२६] |
| ५. | प्रशिक्षित<br>शिक्षकांची<br>टक्केवारी | ७९. १<br>[५८. १] | ८८. ४<br>[८८. ५] | ८८. ८<br>[८९. ५] | ८६. ३<br>[८७. ९] |

* टीप- कंसातील आकडे मुलींची पटसंख्या/एकूण स्त्री शिक्षक/ व प्रशिक्षित स्त्री शिक्षकांची माहिती दर्शवितात.

संदर्भ : सर्वसाधारण शिक्षणावरील सांख्यिकी माहिती [ऑगस्ट १९८६]

आदिवासी उपयोजने अन्तर्गत माध्यमिक शाळांची माहिती

सन १९८४-८५

| अनु. क्र. | बाब | माध्यमिक | उच्च माध्यमिक | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थांची संख्या | ३१० | ४३ | ३५३ | |
| २. | पटसंख्या | ९५९७२ [२९६२४] | ४३२९२ [१४६००] | १३९२६४ [४४२२४] | |
| ३. | एकूण शिक्षक | ३२८१ [३८७] | १३२७ [२५८] | ४६०८ [६४५] | |
| ४. | प्रशिक्षित शिक्षक | २९४१ [३६२] | १२३८ [२४७] | ४१७९ [६०९] | |
| ५. | प्रशिक्षित शिक्षकांची टक्केवारी | ८९.६ [९३.५] | ९३.३ [९५.७] | ९०.७ [९४.४] | |

* टिप - कंसातील आकडे मुलींची पटसंख्या एकूण स्त्री शिक्षक व प्रशिक्षित स्त्री शिक्षकांची माहिती दर्शवितात.

संदर्भ :- सर्वसाधारण शिक्षणावरील सांख्यिकी माहिती ऑगस्ट १९८६.

## प्रकरण- ३

## आदिवासी क्षेत्रातील शैक्षणिक स्थितीचा आढावा

### ३.१. प्रास्ताविक

[भारतीय संविधानाच्या] राज्यघटनेच्या ५ व्या परिशिष्टात महाराष्ट्र राज्यात आढळणाऱ्या विविध अनुसूचित जमातींची यादी देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. राज्याचे आदिवासी उपयोजना क्षेत्र बहुतांशी जंगल व दुर्गम डोंगराळ भागाने व्यापलेले आहे. त्यामुळे दळणवळणाची सोय व संपर्क कमी असल्याने सदर विभाग इतर भागाशी तुलना करता मागासलेला आहे. शैक्षणिक सुविधांच्या बाबतीतही आदिवासी क्षेत्रांत मागासलेपणा दिसून येतो. परिणामत: आदिवासी विभागात शिक्षणाची आवाळ प्रकर्षाने जाणवते. पर्यायाने साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आढळून येते. खानेसुमारीच्या आकडेवारीवरुन असे दिसते की, अद्याप आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण सर्वसाधारण लोकांपेक्षा फारच कमी आहे.

तक्ता ३.१

महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण

| वर्ष | सर्वसाधारण | | | आदिवासी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्रीया | एकूण | पुरुष | स्त्रीया |
| १९६१ | २९.८२ | ४२.०४ | १६.७६ | ७.२१ | १२.५५ | १.७५ |
| १९७१ | ३९.१३ | ५१.०४ | २६.४३ | ११.७४ | १९.०६ | ४.२१ |
| १९८१ | ४७.०२ | ५८.६५ | ३४.६३ | २२.२९ | ३२.३८ | ११.९४ |

तक्ता क्र. ३.२

१९८४-८५ सालासाठी वयोगटानुरूप अंदाजलेली लोकसंख्या/नोंदलेली मुले व त्यांचे प्रमाण

| मुले/मुली एकूण | वयोगट/ इयत्ता | सर्वसाधारण | | | आदिवासी जमाती | | | अनुसूचित जाती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लोकसंख्या | नोंदलेले विद्यार्थी | टक्केवारी | लोकसंख्या | नोंदलेले विद्यार्थी | टक्केवारी | लोकसंख्या | नोंदलेले विद्यार्थी | टक्केवारी |
| | | [000] | [000] | | [000] | [000] | | [000] | [000] | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| मुले | ६ ते ९ | ३०६२ | ४२८३ | १४० | २८२ | ३८६ | १३७ | ४१७ | ६२२ | १४९ |
| | १० ते १२ | २८५४ | २०७९ | ७३ | २६३ | ११३ | ४३ | ३८९ | २८९ | ७४ |
| | १३ ते १५ | २२७१ | १३४८ | ५९ | २०९ | ५४ | २५ | ३०३ | १८० | ६० |
| मुली | ६ ते ९ | २९३६ | ३५०८ | ११९ | २७० | २५४ | ९४ | ४०० | ४८८ | १२२ |
| | १० ते १२ | २६८४ | १३५१ | ५० | २४७ | ४८ | १९ | ३६६ | १५६ | ४३ |
| | १३ ते १५ | २१५१ | ६८१ | ३२ | १९८ | १९ | १० | ३९३ | ७४ | २५ |
| एकूण | ६ ते ९ | ५९९८ | ७७९१ | १३० | ५५२ | ६४० | ११६ | ८१७ | १११० | १३६ |
| | १० ते १२ | ५५३८ | ३४३० | ६२ | ५१० | १६१ | ३२ | ७५५ | ४४५ | ५९ |
| | १३ ते १५ | ४४२२ | २०२९ | ४६ | ४०७ | ७२ | १८ | ५९६ | २५४ | ४२ |

संदर्भ :- पान नं. [३] तक्ता नं.३ [पुस्तक सर्वसाधारण शिक्षणावरील सांख्यिकी माहिती] शिक्षण खाते, ऑगस्ट, १९८६]

३. २. १९८४–८५ सालासाठी वयोगटानुसार अंदाजलेली लोकसंख्या व शाळेत नोंदलेले विद्यार्थी ह्यांची तक्ता क्र. ३. २ मध्ये दिलेली टक्केवारी पाहिली असता असे दिसते की, ६–९ या वयोगटातील विद्यार्थ्यांची नोंद मोठ्या संख्येने होते. परंतु १०–१२ वयोगटातील नोंद फक्त ३२ टक्के तर १३–१५ वयोगटातील नोंद फक्त १८ टक्के एवढी होते. यावरून आदिवासी मुलांची शाळेतील गळती मोठ्या प्रमाणावर आहे हे दिसून येते. त्या मानाने सर्वसाधारण विद्यार्थ्यांमध्ये हे प्रमाण कमी असल्याचे आढळून येते.

३. ३. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हा निहाय साक्षरतेचे प्रमाण तक्ता क्र. ३. ३ मध्ये दिले असून त्यावरून असे दिसते की, साक्षरतेचे प्रमाण ठाणे जिल्हयात सर्वात कमी म्हणजे [१४. ४] टक्के एवढे आहे. या उलट हे प्रमाण नागपूर जिल्हयात सर्वात जास्त म्हणजे ४२. ६ टक्के एवढे आहे. पुरूष व स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण सुध्दा ठाणे जिल्हयांत सर्वात कमी तर नागपूर जिल्हयांत सर्वात जास्त आहे.

तक्ता क्र. ३. ३

राज्य उपयोजना क्षेत्रांतर्गत जिल्हा निहाय लोकसंख्या व साक्षरता प्रमाण

[१९८१ च्या जनगणनेनुसार] [लोकसंख्या हजारामध्ये]

| अ. नं. | जिल्हा | आदिवासी | | साक्षर आदिवासी | | साक्षरतेचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | ठाणे | ७२९ | ३६० | १०५ | २३ | २२. ३ | ६. ३ | १४. ४ |
| २. | रायगड | १९० | ९४ | २१ | ९ | २३. ४ | ९. ४ | १६. ५ |
| ३. | नाशिक | ७०२ | ३४७ | ११७ | २८ | २५. २ | ८. ० | १६. ७ |
| ४. | धुळे | ८३१ | ४१४ | १२७ | २८ | २३. ७ | ६. ७ | १५. ३ |
| ५. | जळगांव | २१६ | १०६ | ४३ | १० | ३०. ६ | ९. ० | १९. ९ |
| ६. | पुणे | १५९ | ७७ | ४४ | ११ | ४०. २ | १४. ८ | २७. ८ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | अहमदनगर | १८८ | ९३ | ३२ | ७ | २६.५ | ७.१ | १६.९ |
| ८. | नांदेड | १७८ | ८८ | ३७ | ७ | ३३.३ | ७.४ | २०.५ |
| ९. | अमरावती | २४२ | ११८ | ६२ | २० | ३४.४ | १६.६ | २५.७ |
| १०. | यवतमाळ | ३७० | १८३ | ९० | २४ | ३५.५ | १३.० | २४.४ |
| ११. | नागपूर | ३५३ | १७१ | १५१ | ५२ | ५३.९ | ३०.६ | ४२.६ |
| १२. | भंडारा | २९८ | १५० | ९९ | २७ | ४८.५ | १८.० | ३३.१ |
| १३. | चंद्रपूर | ५५० | २७३ | १२२ | ३१ | ३३.१ | ११.३ | २२.३ |

३.४. तक्ता क्र.३.३ वरून सर्वसाधारण आदिवासी समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. त्याचे एक कारण म्हणजे विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण सर्वसाधारण समाजातील मुलांपेक्षा अधिक आहे. तक्ता नं.३.४ वरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होते.

पहिल्या वर्गात १०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे असे गृहित धरले तर वर्ग-४ पर्यंत सर्वसाधारण समाजातील ४१ विद्यार्थी शाळेतून गळतात. तर आदिवासी समाजातील ६१ विद्यार्थी शाळेतून गळतात. वर्ग-७ पर्यंत सर्वसाधारण समाजातील ६३ विद्यार्थी शाळा सोडून जातात. तर आदिवासी समाजामध्ये ८० विद्यार्थी शाळा सोडून जातात असे दिसते. म्हणजे वर्ग-१० पर्यंत सर्वसाधारण विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी शिकतात तर आदिवासी मध्ये फक्त १२ च विद्यार्थी शिकतात असे दिसते. शाळा सोडून जाण्यामध्ये आदिवासी समाजातील मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा मोठे आहे.

वरील स्थिती संपूर्ण राज्याची असून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील चित्र तर ह्यापेक्षा गंभीर आहे. तेथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आहे.

तक्ता क्र. ३.४

महाराष्ट्र राज्यातील सन १९८४–८५ मध्ये झालेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण

| वर्ग | सर्वसाधारण | | | अनुसूचित जमाती | | | अनुसूचित जाती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| २. | १८ | २२ | २० | २७ | ३४ | ३० | ३४ | २८ | २६ |
| ३. | २४ | २९ | २६ | ४१ | ५१ | ४५ | ३० | ३९ | ३४ |
| ४. | ३८ | ४६ | ४१ | ५७ | ६८ | ६१ | ४३ | ५२ | ४५ |
| ५. | ४१ | ५२ | ४६ | ६५ | ७६ | ७० | ४५ | ६१ | ५२ |
| ६. | ५२ | ६३ | ५७ | ६९ | ८२ | ७४ | ५५ | ७० | ६२ |
| ७. | ५८ | ६९ | ६३ | ७७ | ८४ | ८० | ६० | ७४ | ६६ |
| ८. | ६२ | ७९ | ६८ | ७९ | ८७ | ८२ | ६२ | ७८ | ६९ |
| ९. | ६७ | ८० | ७३ | ८३ | ९० | ८६ | ६७ | ८२ | ७३ |
| १०. | ७४ | ८४ | ७८ | ८६ | ९१ | ८८ | ७७ | ८७ | ८१ |

३.५. आदिवासी समाजामध्ये शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक का आहे, याची पहाणी करण्यासाठी ठाणे जिल्हयात आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण फारच कमी [१४.४ %] असल्याने ठाणे जिल्हयातील शिक्षणाबाबतची सद्यस्थिती पहाणे आवश्यक आहे.

३.६. ठाणे जिल्हयातील शिक्षण व इतर बाबींबाबत सद्यस्थिती :

ठाणे जिल्हयात एकूण १७७३ गांवे असून ३४ शहरे आहेत. १९८१ च्या खानेसुमारीनुसार एकूण लोकसंख्या ३३.५२ लाख असून त्यात १७.८० लाख पुरूष व १५.७२ लाख स्त्रिया आहेत. साक्षरतेचा विचार केला असता जिल्हयातील ५०.५० टक्के लोक साक्षर आहेत. पण ग्रामीण भागाचा विचार केला असता हेच

प्रमाण ३८.५८ टक्के असून आदिवासी मधील साक्षरतेचे प्रमाण फक्त १४.४ टक्के इतके आहे. शिक्षणाबाबत सोयींचा विचार केला असता जिल्हयातील ९७.९८ टक्के गावांमध्ये शाळेची सोय केलेली आहे.

३.७. शाळेतील विद्यार्थ्यांची गळतीबाबत पहाणी करणेसाठी जव्हार तालुका निवडला आहे. तालुक्यात एकूण १२३ गांवे व १ शहर असून १९८१ च्या जनगणनेप्रमाणे एकूण लोकसंख्या १.०९ लाख आहे. त्यात पुरूष ०.५५ व स्त्रिया ०.५४ आहेत. तालुक्यातील एकूण साक्षरतेचे प्रमाण १७.१६ टक्के असून स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण फक्त ९.९० टक्के तर पुरूषांचे तेच प्रमाण २४.४५ एवढे आहे.

तालुक्यात एकूण १५९ जिल्हा परिषदेच्या शाळा असून त्यात एक शिक्षकी शाळा १२१ आहेत. तर उरलेल्या ३८ शाळा बहुशिक्षकी आहेत. त्यात एकूण ९०४५ विद्यार्थी शिकत असून त्यामध्ये ५५८० मुलगे व ३४६५ मुली आहेत.

तालुक्यासाठी एकूण २५७ शिक्षकांची पदे मंजूर केली आहेत. त्यापैकी २५५ शिक्षकांच्या जागा भरण्यांत आलेल्या आहेत. तालुक्यात एकूण १६ प्राथमिक शाळांना शाळेच्या इमारती नाहीत.

३.८. <u>आश्रमशाळा</u> :

तालुक्यात १३ आश्रमशाळा आहेत, त्यातील १० शासकीय व ३ अनुदानीत आहेत. हया आश्रमशाळांतून एकूण ३१७३ विद्यार्थी शिकत असून त्यात २११४ मुले व १०५९ मुली आहेत.

३.९. <u>माध्यमिक शाळा</u> :

तालुक्यात एकूण ९ माध्यमिक शाळा आहेत. त्यांत ४ पोस्टबेसिक आश्रमशाळांचा समावेश आहे. तेथे एकूण २८७९ विद्यार्थी शिकत असून त्यामध्ये १९५० मुलगे व ९२२ मुली आहेत.

३.१०. महाविद्यालय :

तालुक्यात जव्हार येथे एक ज्युनिअर कॉलेज/कनिष्ठ महाविद्यालय आहे. त्यात कला व वाणिज्य शाखा आहेत. त्यात एकूण २१० विद्यार्थी शिकत असून त्यामध्ये १६३ मुलगे व ४७ मुली आहेत. हे विद्यालय खाजगी संस्थेने चालविले आहे. तेथे १० प्राध्यापक आहेत.

३.११. बालवाड्या :

तालुक्यात एकूण ६ बालवाड्या मंजूर झालेल्या आहेत. त्यापैकी ३ बालवाड्या चालू असून त्यात ६१ मुलगे व ५४ मुली आहेत. एकूण ११५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

३.१२. अंशकालीन वर्ग :

तालुक्यात आठ अंशकालीन वर्ग चालू असून त्यामध्ये ९ ते १४ वयोगटातील शाळेच्या बाहेरील मुलांना शिक्षण दिले जाते. त्याचा फायदा एकूण १९९ विद्यार्थ्यांना होतो. त्यात १३२ मुलगे व ६७ मुली आहेत.

......

## प्रकरण-४

### जव्हार तालुक्यातील आदिवासी मुलांच्या गळतीचा अभ्यास

**प्रास्ताविक :-**

४.१ आदिवासी समाजात शिक्षणाची प्रगती का झाली नाही हे पडताळून पहाणेसाठी जव्हार तालुक्यातील विक्रमगड, गरदवाडी व गोरठण ही गावे सर्वेक्षणासाठी निवडली होती. त्या गावातील ज्या मुलांची शाळेतून गळती झाली त्यांच्या कुटुंबाना प्रत्यक्ष भेटून या प्रश्नाची माहिती मिळविली. पहाणीसाठी निवडलेल्या गावाची लोकसंख्या, आदिवासींची लोकसंख्या व एकूण साक्षरता दाखविणारा तक्ता खाली दिला आहे.

तक्ता क्र.४.१

| गावाचे नांव | एकूण लोकसंख्या | | | आदिवासी लोकसंख्या | | | साक्षरता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ]विक्रमगड | ३५४७ | १८२९ | १७१८ | १८७० | ९६१ | ९०९ | १४१५ | १०६१ | ३५४ |
| | | | | | | | ४०% | ५८% | २१% |
| ] गरदवाडी | ४६६ | २४१ | २२५ | ४६६ | २४१ | २२५ | १०१ | ७५ | २६ |
| | | | | | | | २२% | ३१% | १२% |
| ] गोरठण | १२३३ | ५८५ | ६४८ | १२२३ | ५८२ | ६४१ | १७७ | १४५ | ३२ |
| | | | | | | | १४% | २५% | ५% |

विक्रमगडची ५० % लोकसंख्या बिगर आदिवासी आहे.

४.२ [अ] निवडलेले कुटुंबे :-

एकूण तिन्ही गावातून ७८ कुटुंबांचे सर्वेक्षण केले. सर्वेक्षणातून खालील माहिती स्पष्ट झाली.

[१] जमातीनुरुप कुटुंबाचे सर्वेक्षण :-

निवडलेल्या एकूण ७८ कुटुंबांपैकी ३२ [४१%] कुटुंबे कोकणा जमातीची, १५ [१९%] वारली जमातीची, ८ [९%] कातकरी व ७ [९%] क.ठाकूर जमातीची कुटुंबे आहेत. उरलेली १६ कुटुंबे [२२%] बिगर आदिवासी आहेत.

| अ.नं. | जमात | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कोकणा | ३२ | ४१% |
| २. | वारली | १५ | १९% |
| ३. | कातकरी | ८ | ९% |
| ४. | क.ठाकूर | ७ | ९% |
| ५. | इतर [बिगर आदिवासी] | १६ | २२% |
| | एकूण | ७८ | १००% |

[२] आकारमानाप्रमाणे कुटुंबाची विभागणी :-

एकूण निवडलेल्या कुटुंबापैकी १६ कुटुंबे [२०%] १ ते ४ माणसांची तर ३६ कुटुंबे [४६%] ५ ते ६ माणसांची तर २० कुटुंबे [२६%] ७ ते ८ माणसांची आहेत. तर ८ पेक्षा जास्त माणसे असलेली कुटुंबे फक्त ६ [८%] आहेत.

थोडक्यात आदिवासींमध्ये कुटुंबाचा आकारमान सर्वसाधारण ५ ते ६ माणसांचा आहे. आदिवासी समाजात सर्वसामान्यपणे विभक्त कुटुंब पध्दती आढळून आली. त्यांत नवरा, बायको, व मुले यांचा प्रामुख्याने समावेश आढळला.

| अ.क्र. | आकारमान | कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते ४ माणसे | १६ | २०% |
| २. | ५ ते ६ माणसे | ३६ | ४६% |
| ३. | ७ ते ८ माणसे | २० | २६% |
| ४. | ८ पेक्षा जास्त | ६ | ८% |
| | एकूण | ७८ | १००% |

[३] व्यवसायानुरुप कुटुंबाचे वर्गीकरण :-

कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय विचारात घेतला असता असे आढळून आले आहे की, ४९ [६३%] कुटुंबांची शेती हा मुख्य व्यवसाय असून १७ [२२%] कुटुंबाचा शेतमजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे व उरलेल्या १२ [१५%] कुटुंबाचा व्यवसाय घरगुती सेवा, घरगडी अशा प्रकारचे आहेत. थोडक्यात जवळजवळ ८५% लोकांची उपजीविका शेतीवर निर्भरित आहे.

[४] उत्पन्नाप्रमाणे कुटुंबाचे वर्गीकरण :-

एकूण कुटुंबापैकी ६४ [८२%] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. ४००० पेक्षा कमी असून उरलेल्या पैकी ५ [६%] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. ४००१ ते ६००० पर्यन्त आहे. तर ९ [१२%] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६००१ पेक्षा अधिक आहे. म्हणजे थोडक्यात [८२%] कुटुंबे ही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत, असे आढळून आले.

| अ.नं. | उत्पन्नाची मर्यादा [रू.] | कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ४००० पर्यन्त | ६४ | ८२% |
| २. | ४००१ ते ६००० | ५ | ६% |
| ३. | ६००१ पेक्षा जास्त | ९ | १२% |
| | एकूण – | ७८ | १००% |

[५] शाळेत जाणा-या व गळती झालेल्या मुलांची संख्या :-

७८ कुटुंबामध्ये एकूण ९३ मुलगे व ६७ मुली असे [१६०] विद्यार्थी आढळले. त्यातील ३८ मुलगे व ३१ मुली शाळेत [६९] जाणारी आढळली. तर ५५ मुलगे व ३६ मुलींची शाळेतून गळती झाल्याचे आढळून आले. यावरून या कुटुंबात ५७% मुलगे व ५४% मुलींची शाळेतून गळती झाली आहे असे दिसते.

| अ.न. | प्रकार | विद्यार्थी | | |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण |
| [१] | शाळेत जाणारी | ३८ | ३१ | ६९ |
| [२] | गळती झालेली | ५५ | ३६ | ९१ |
| | एकूण | ९३ | ६७ | १६० |

[६] शाळेतून गळती झालेल्या मुलांची वयानुरूप विभागणी :-

एकूण विद्यार्थ्यांच्या ४४ विद्यार्थी [४५%] वयाच्या १० व्या वर्षापर्यन्त शाळेतून गळती झालेली आढळतात. ह्यात मुलांच्या गळतीचे प्रमाण ४२% [२३] व मुलींच्या गळतीचे प्रमाणे ५८% [२१] इतके आहे. यावरून असे दिसून येते की, जवळ जवळ निम्मे विद्यार्थ्यांची वयाच्या १० व्या

वर्षापर्यन्त शाळेतून गळती झाली आहे.

| अ.नं. | वयोगट | शाळा सोडून गेलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण |
| १] | ६ ते ७ | ९ | ९ | १८ |
| २] | ८ ते ९ | ७ | ७ | १४ |
| ३] | १० | ७ | ५ | १२ |
| ४] | ११ च्या पुढे | ३२ | १५ | ४७ |
| | एकूण - | ५५ | ३६ | ९१ |

[७] इयत्तावार विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण :-

इयत्तावार गळतीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ९१ विद्यार्थ्यांपैकी ५१ विद्यार्थी [५७%] इयत्ता ४ थी पर्यन्त शाळेतून गळती झालेले आहेत. ६९ विद्यार्थी [७६%] सातवी पर्यन्त शाळेतून गळती झालेली आहेत. मुला-मुलींच्या बाबत स्वतंत्र विचार केला तर ४२ [७५%] मुलगे व १७ [८१%] मुली ७ वी पर्यन्त शाळेतून गळती झालेल्या आहेत.

| अ.नं. | इयत्ता गट | गळती झालेले | | |
|---|---|---|---|---|
| | | मुली | मुले | एकूण |
| १] | दुसरी | १५ | २० | ३५ |
| २] | दुसरी ते चौथी | ८ | ८ | १६ |
| ३] | चौथी ते सातवी | ४ | १४ | १८ |
| ४] | सातवी ते दहावी | ९ | १३ | २२ |
| | एकूण | ३६ | ५५ | ९१ |

[८] शाळेतून गळती झालेल्या विद्यार्थ्यांचे कारणाप्रमाणे वर्गीकरण :-

एकूण ९१ विद्यार्थ्यांपैकी २५ [२८%] विद्यार्थ्यांनी घरकामासाठी शाळा सोडली. २४ [२७%] विद्यार्थी नापास झाल्याने शाळेतून गळाले. १३ [१४%] विद्यार्थ्यांनी घरच्या गरीब आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडली. १३ [१४%] विद्यार्थ्यांनी भावंडे सांभाळणे, गुरे सांभाळणे ह्या कारणासाठी शाळा सोडली. १० [१०%] विद्यार्थी शेतमजूरी

करण्यासाठी शाळा सोडली. तर ६ [७%] मुलींनी त्यांची लग्ने झाल्यामुळे शाळा सोडली. यावरून असे ढोबळ मानाने म्हणता येईल की, बहुसंख्य विद्यार्थी केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडून जातात.

[९] <u>गळती झालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेतून गळती झाल्यानंतर करत व्यवसायानुरूप वर्गीकरण</u> :-

शाळा सोडण्याच्या कारणांची मिमांसा केल्यानंतर गळती झालेले विद्यार्थी काय काम करतात ह्याचा अभ्यास केला असता असे आढळून आले आहे की, ९१ विद्यार्थी पैकी जवळ जवळ सर्वच मुले कोणता ना कोणता व्यवसाय करून घराला चार पैसे कमवून आणून देतात. त्यात शेती व शेतमजूरी करणारे ३८ [४२%] विद्यार्थी, ९ [१०%] विद्यार्थी, नोकरी, शिवणकाम, मासेमारी इत्यादि उद्योग करतात. तर ४४ [४८%] विद्यार्थी घरकामात व गुरे सांभाळणे ह्यासाठी कुटुंबास मदत करतात.

[ब] प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते ह्याच्याकडून शाळेतून गळती का होते व ती थांबणे साठी काय उपाय योजना करता येईल हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार केली होती. त्यांत गोळा करण्यात आलेल्या आलेल्या माहितीनुसार असे आढळून आले की, मुलांच्या पालकांच्या अज्ञानामुळे, अंधश्रध्देमुळे, गरीबीमुळे व वारंवार उद्योगधंद्यामुळे स्थलांतर करण्यामुळे शाळा सोडून यावी लागते. त्यावर उपाय म्हणजे मुलांसाठी आश्रमशाळा वसतिगृह निर्माण करावीत.

[क] पत्रक क्र. ३ मध्ये जमा करण्यात आलेल्या माहितीनुसार इयत्तावार गळती झालेल्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण पुढील <u>तक्ता क्र. ४.३</u> मध्ये दिले आहे. त्यावरून असे दिसते की, मुलांमध्ये इ. ४ थी पर्यन्त ४४%, ५ ते ८ वी पर्यन्त ५०% व ९ वी ते १० वी पर्यन्त ६% गळती होते तर तीच मुलींच्या बाबतीत अनुक्रमे ५२%, ४०% व ८% एवढी आढळून येते.

## तक्ता क्र. ४.३

### निवडलेल्या शाळेतील इयत्तावार गळती झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या

| गांवाचे नांव/शाळा | गळती झालेली मुले/मुली इयत्ता १ मुले | १ मुली | २ मुले | २ मुली | ३ मुले | ३ मुली | ४ मुले | ४ मुली | ५ मुले | ५ मुली | ६ मुले | ६ मुली | ७ मुले | ७ मुली | ८ मुले | ८ मुली | ९ मुले | ९ मुली | १० मुले | १० मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १] गोरवाडी [१ते३] | ६ | २ | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ७ | २ | |
| २] गरदवाडी [१ते४] | – | – | ५ | ४ | १ | २ | १ | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ७ | ७ | |
| ३] गोरठण [१ते५] | ७ | १० | ६ | ४ | २ | १ | २ | २ | ३ | २ | २ | ० | – | – | – | – | – | – | २२ | १५ | |
| ४] विक्रमगड [५ते१०] | – | – | – | – | – | – | – | – | २' | – | [illegible] | १ | ५ | ३ [२०] | १४ | ३ | – | १ | ३५ | २२ | |
| | १३ | १२ | ११ | ८ | ४ | ३ | ३ | ३ | ५ | २ | ६ | १ | ५ | ३ | १४ | ३ | — | १ | ७१ | ५० | |

४.३ <u>जातीनिहाय विश्लेषण</u> :-

[१] आदिवासी जमातीनिहाय विचार केला असता कोकणामध्ये ३२ कुटुंबापैकी २७ कुटुंबामध्ये ५ पेक्षा जास्त माणसे आहेत. त्याचप्रमाणे वारली जमातीमध्ये १५ पैकी १३ कुटुंबामध्ये ५ पेक्षा जास्त माणसे आहेत तर कातकरी कुटुंबामध्ये ८ पैकी ८ कुटुंबामध्ये फक्त ६ पर्यन्त माणसे आहेत.

[२] कोकणा व वारली जमातीमध्ये बहुसंख्य लोक शेती हे मुख्य उपजीविकेचे साधन आहे तर कातक-यांमध्ये शेतमजूर हे मुख्य उपजीविकेचे साधन आहे.

[३] उत्पन्नाप्रमाणे जमातीचा विचार केला असता बहुतेक जमातीचे उत्पन्न ४००० पेक्षा कमी आहे. मात्र कोकणामधील ३ व वारलीमधील ४ कुटुंबाचे उत्पन्न ४००१ पेक्षा जास्त आहे.

[४] शाळेत जाणा-या न जाणा-या मुलांचा विचार केला असता असे आढळते की, कोकणा जमातीतील एकूण ३० मुलांपैकी १३ मुले शाळेत जातात. तर १९ मुले शाळेत जात नाहीत. एकूण ३४ मुलींपैकी १६ मुली शाळेत जात नाहीत. त्यामानाने वारली जमातीमध्ये जवळ जवळ निम्मी मुले व मुली शाळेत जातात. तर निम्मी मुले मुली शाळेत जात नाहीत. क.ठाकूर ह्या जमातीमध्ये एकूण १६ मुलांपैकी ६ मुले शाळेत जातात तर १० शाळेत जात नाहीत. १ मुलगी आहे ती शाळेत जात नाही असे दिसते. कातकरी जमातीमध्ये एकूण ७ मुलगे व ३ मुली असून त्यांचेपैकी एक मुलगी शाळेत जात असून बाकीचे शाळेत जात नाहीत.

[५] गळती झालेल्या मुलांचा वयानुसार विचार केला असता असे आढळून येते की, वारली जमातीमध्ये मुले व मुली १० व्या वर्षानंतर शाळा सोडतात. कातकरी जमातीमध्ये मुली ८ व्या वर्षापर्यन्त तर मुले ९ व्या वर्षानंतर शाळेतून गळती झालेले आढळले.

[६] गळतीच्या कारणांचा विचार केला असता घरकामामुळे कोकणा व कातकरी जमातीतील अनुक्रमे १३ व ६ विद्यार्थ्यांनी शाळा सोडली आहे. तर सतत नापासामुळे कोकणामधील ९ तर वारली जमातीतील ४ विद्यार्थ्यांनी शाळा सोडलेली आहे, असे दिसते. त्याचप्रमाणे

४ विद्यार्थ्यांनी लग्न झाल्यामुळे शाळा सोडली आहे.

[७] शाळेतून गळती झालेले विद्यार्थी कोणता व्यवसाय करताना दिसतात ह्यांची पहाणी केली असता असे आढळते की, कोकणा जमातीतील सर्वात जास्त विद्यार्थी [१४] दारकाम करतात. तर ९ विद्यार्थी शेती करत असून ७ विद्यार्थी गुरे सांभाळण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे क.ठाकूर मधील ८ विद्यार्थी शेतमजूरी करतात. तर कातक-यामधील ६ विद्यार्थी गुरे सांभाळण्याचे काम करतात असे आढळून आले आहे.

[८] वयाप्रमाणे गळतीचे विश्लेषण केले असता असे दिसते की, कोकणा व वारली जमातीमध्ये ३ वर्षापर्यन्त अनुक्रमे १९ व ११ विद्यार्थी शाळा सोडून गेले तर कातकरी मध्ये २ वर्षापर्यन्तचे ८ विद्यार्थी शाळा सोडून गेलेले आहेत.

......

प्रकरण-५

## आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळतीची कारणमिमांसा

५.१ प्रास्ताविक :-

आदिवासी समाज अद्यापही शिक्षणाच्या बाबतीत फार मागे आहे. त्याला कारण म्हणजे त्या समाजातील अज्ञान, लाचारी, दास्य व बुजरेपणा हे होय. त्याचप्रमाणे त्यांचे जीवन म्हणजे मंत्र, तंत्र, अंधश्रध्दा, रुढी व खुळ्या कल्पना हयांनी कुंठीत झाले आहे. हे सारे बदलण्यास शिक्षण हाच एकमेव उपाय असून त्यासाठी समाज सुधारकांनी, शिक्षकांनी प्रचार माध्यमाचा उपयोग करुन शिक्षणाचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे व ते सध्या फार कमी पडते असे दिसून आले आहे.

आदिवासी मुलांची शाळेतून गळती का होते याची महत्वाची खालील कारणे पहाणीत आढळून आली आहेत.

[१] आर्थिक कारणे :- आदिवासी समाजात मुलगा अगर मुलगी १० वर्षांची झाली की, ती काहीना काही उद्योग करुन कुटुंबासाठी पैसे कमावून आणतो अगर आई-वडिलांना रोजगार करता यावा म्हणून लहान मुलांना शेळ्या मेंढयांना सांभाळणे इत्यादि कामे करतात. त्यामुळे मुलगा शाळेत गेला की, त्या कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. गरीब आदिवासी कुटुंबे मोलमजुरीवर उदरनिर्वाह करत असल्याने पावसाळ्यात शेतीवर त्यांना मजुरी करावी लागते. पावसाळा संपला की गावच्या पीक कापणीवर, साखर कारखान्याच्या परिसरात ऊस कापणीवर अगर विटांच्या भट्टयावर त्यांना मजुरी करावी लागते. त्याशिवाय जंगलात गवत कापणे, लाकूडफाटा गोळा करणे, मासेमारी करणे इ. कामे करावी लागतात. त्यामुळे कुटुंबाला स्थिर असे उत्पन्न मिळत नाही. उद्योगधंदयाच्या ठिकाणी मुलांना घेऊन जावे लागते. त्यामुळे मुलांना शाळेत जाता येत नाही. ते शाळेत जातात त्यावेळी त्यांचे अभ्यासात त्यांचे मन रमत नाही. अभ्यासात ते मागे पडतात. एकेका वर्गात दोन वर्षे नापास होतात व परिणामत: शेवटी शाळा सोडून देतात. पहाणीत असे आढळून आले आहे की, ९१ विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थी [६६%] केवळ या कारणामुळे शाळेतून गळती झालेले आहेत.

५.२ [२] शिक्षणाबाबत अनास्था :-

आदिवासी समाजामध्ये जीवनाकडे पहाण्याचा त्यांचा

दृष्टिकोण थोडा निराळा आहे. तो पुढील आयुष्याचा फारसा विचार करीत नसल्याने मुलगा शिकून चांगला होईल, त्याचे जीवन उंचावेल असा विचारच करीत नाही. त्यामुळे शिक्षणाला महत्व न देता शाळेत जाण्याच्या वयातील मुलांकडून आर्थिक उत्पन्न करून घेतात व मुलांना शाळेतून काढून शिक्षणापासून वंचित करतात.

शिक्षणाबाबत अनास्था असल्याने गावात शाळा झाल्या तरी मुलांना गुराढोरांच्या मागे जावे लागते. शाळेत जाणाऱ्या मुलांचा उपयोग मुलांना सांभाळण्यासाठी, लाकूडफाटा गोळा करण्यासाठी व रानातील फळे गोळा करण्यासाठी केला जातो. त्यामुळे एकेका वर्गास दोन दोन वर्षे राहून शेवटी मुले शाळा सोडून जातात. पहाणीमध्ये २४ [२७%] मुलांनी हयामुळे शाळा सोडली आहे असे आढळून आले आहे.

[३] <u>जीवन रहाटी</u> :-

आदिवासी लोकांचे जीवन तसे मोकळे असते. मुलांना शाळेत बसून राहणे, बंदिस्त, रूक्ष व निरस वाटे. त्यामुळे आदिवासींची मुले शाळेत थांबून अभ्यास करीत बसतील असे संभवत नाही. त्यांना खरी गोडी रानांत भटकणे, झाडावर चढणे, नदीत डुंबणे, खेकडे, मासे पकडणे हयामध्ये जास्त आवड व रस त्यामुळे शाळेतील अभ्यास क्रमात त्यांना गोडी वाटत नाही व शेवटी ती मुले कंटाळून शाळा सोडून जातात.

[४] <u>आदिवासी समाजावर मंत्र तंत्र व जादूटोण्याचा परिणाम</u> :-

आदिवासी समाजात मंत्र, तंत्र व जादूटोणा हयाचे प्रस्थ आहे. त्यांचा विश्वास त्यांच्या भगतावर जास्त असतो. शाळेतील मुले आजारी पडतातच. ती का पडली, कोणत्या आजाराने आजारी आहेत, त्या आजाराचे कारण काय, त्यावर डॉक्टरी उपाय न करता ते भगताकडे जाऊन उपाय करतात. भगतावर त्यांचा विश्वास असल्याने तो जे-जे उपाय सांगेल ते करतात.

[५] <u>अभ्यासक्रम</u> :-

आदिवासींच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे जाणीव, जागृती, ज्ञानाची गोडी लागणे, जीवनाचा विचार करण्याची पात्रता निर्माण करणे, जिद्द निर्माण करणे व जीवनाची उंची वाढविणे. त्यासाठी कोणताही शिक्षणक्रम, आकृतीबंध, आराखडा सक्तीचा असणे विद्यार्थ्यांना जड जाते. विद्यार्थ्याला वाचनाची गोडी उत्पन्न करणे, विचार

करण्यास शिकवणे हे सध्याच्या अभ्यासक्रमात अधिक असले पाहिजे. सध्याचे अभ्यासक्रम आदिवासी विद्यार्थ्यांना पेलणारे दिसत नाहीत. बराचसा अभ्यासक्रम हा शहरी मुले डोळ्यासमोर ठेवून आखला जातो. त्यामुळे अभ्यासक्रमातील पुष्कळशा गोष्टींची माहिती व साधी कल्पनाही आदिवासी विद्यार्थ्यांना नसते. त्यामुळे त्या त्याला समजण्यास अवघड जातात. शिक्षकांना सुध्दा त्या गोष्टी विद्यार्थ्यांना समजावून सांगणे कठीण जाते. अशा परिस्थितीत मुलगा कच्चा राहतो व शेवटी तो विषय त्याला नावडता होऊन शाळेबाबत त्याला तिरस्कार वाटू लागतो.

आदिवासींच्या घरात अभ्यास करण्यासाठी जागा नसते. घरातील अशैक्षणिक वातावरणामुळे त्याला अभ्यास करणे जमत नाही. कच्चा राहिलेला अभ्यास पक्का करण्यास त्याला शाळेत सवड मिळत नाही व घरी तशी सोय नसते. म्हणून शेवटी तो कच्चा राहून नापास होतो. व एक दिवस शाळेला रामराम ठोकतो.

[६] <u>शिकविण्याची पध्दत</u> :-

आदिवासी लोकांना जरी मराठी भाषा कळत असली तरी त्यांची बोलीभाषा, घरात बोलावयाची भाषा वेगळी असते. त्या भाषेत शाळेमध्ये येण्या आधी मुलगा बोलत असतो. पण शाळेत आल्यावर त्याला शिक्षक वेगळ्या भाषेत शिकवितात असल्याने शिकवलेले लवकर कळत नाही व मुलांनी दिलेली उत्तरे त्याच्या बोलीभाषेत असल्याने शिक्षकांना स्पष्ट होत नाही. ह्यामधून शिक्षकाबद्दल व शाळेबद्दल दुरावा उत्पन्न होऊन त्याचे परिणाम शेवटी शाळा सोडण्यात होतो.

[७] <u>परीक्षा पध्दती</u> :-

नवीन परीक्षा पध्दतीप्रमाणे कोणताही मुलगा नापास होता कामा नये असे असल्याने व काही वर्गांची परीक्षा न घेता वरच्या वर्गात विद्यार्थी जात असल्याने सर्व विद्यार्थी पुढील वर्गात जातात. काही विद्यार्थी कच्चे असताना वरील वर्गात जातात. मूळचा अभ्यास कच्चा असल्याने पुढील अभ्यास त्याला कळत नाही व इतर मुलांच्या प्रगतीकडे पाहून त्याला त्याबद्दल न्यूनगंड उत्पन्न होतो व शेवटी त्याला शाळेत जाण्याचा कंटाळा येऊन शाळा सोडून जावे लागते.

[८] शिक्षकवर्ग :-

सध्या देशात असलेली बेकारी लक्षात घेता सहजासहजी नोकरी मिळत नाही, मग जी मिळेल ती नोकरी माणूस पत्करतो व पैसे कमावतो. शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा असेच झाले आहे. पण त्याचा परिणाम पिढ्यांवर होतो हे कोणाच्या लक्षात येत नाही. सध्याच्या ब-याचशा शिक्षकांना शिक्षणाबाबत शाळेबाबत अगर विद्यार्थ्यांबाबत आपुलकी, जिज्ञासा अगर प्रेम आढळत नाही.

शिक्षकांमध्ये ना ध्येय ना निष्ठा ना अभ्यास करण्याची इच्छा. आलेला दिवस घालवणे व पगार घेणे हेच आजचे शिक्षकांचे काम झाले आहे. त्याला गावातील वातावरणसुध्दा कारणीभूत आहे. कारण खेड्यात शिक्षकांना पूर्वीसारखा मान प्रतिष्ठा राहिली नसून तो तो त्या गावातील पुढा-यांचा एक सेवक म्हणून रहात आहे. त्यामुळे त्याला काही पेळा करण्याची इच्छा असून सुध्दा गावातील परिस्थितीमुळे चांगले काम करता येत नाही तर शिक्षणाशिवाय इतर कामातच तो अडकलेला असतो. त्यामुळे शाळेकडे लक्ष राहात नाही.

[९] एक शिक्षकी शाळा :-

आदिवासी भागात एक शिक्षकी शाळा ब-याच असून त्या शाळेत एक शिक्षक ४ वर्ग सांभाळत असतो. बहुतेक शाळेत एक एक फळा असतो. व त्यामुळे एका वेळी शिक्षकाला एका वर्गाकडे लक्ष देता येते. बाकीचे वर्गांचा त्या तासाचा अभ्यास बुडत असतो. अशा रीतीने त्यांना नेमून दिलेल्या तासिकांचा अभ्यास होत नाही. आधीच ज्यांना शिकण्यामध्ये गोडी कमी त्यांच्या अभ्यास तासिकेमध्ये होणारी कपात हयाचा विचार केला असता ती मुले अभ्यासात कच्ची रहातात. हा त्यांचा दोष नाही. कच्चा अभ्यास राहिल्याने परिणामी मुले नापास होतात व पुढे शाळा सोडून देतात.

[१०] शाळा व परिसर :-

आदिवासी भागातील शाळा पाहिल्या तर ब-याचशा शाळा पडक्या घरात, अंधा-या खोलीमध्ये व झोपडीत असतात. त्याचे नाव माता मंदिर म्हणून असते. पण प्रत्यक्षा तो गोठा असतो. ही झाली शाळेची स्थिती. त्यामुळे त्या शाळेत येण्यासाठी मुलांना शाळेचे तेथील वातावरणाचे आकर्षण असे वाटत नाही. ज्याप्रमाणे त्यांची घरे असतात तशीच शाळा असल्यामुळे व घरात मलग पाच तास आदिवासी बसत नसल्याने

शाळेत पाच तास थांबणे मुलांना जिकरीचे जाते.

[११] सामाजिक समस्या :-

आदिवासी जमातीमध्ये मुलगा अगर मुलगी १० ते १२ वर्षांची झाली की मोलमजुरी करुन कुटुंबाला मदत करतात. काही ठिकाणी ह्या वयातच मुलामुलींची लग्ने केली जातात. त्यामुळे मुलींना लग्न झाल्याने शाळा सोडून देऊन संसाराला लागावे लागते.

शिक्षणापेक्षा मुला-मुलींची लग्न केली म्हणजे आई वडिलांना धन्यता वाटते व ते आपल्या जबाबदारीतून मुक्त होतात. लग्न झालेली मुले वेगळी राहून स्वत:चा चरितार्थ भागवतात. त्यांचे शिक्षणापासून काही नडत नाही. त्यामुळे लहान वयातच शाळेतून गळती होण्यास प्रारंभ होतो.

त्याचप्रमाणे त्यांचा असा समज आहे की मुले शिकली की कुटुंबाला दुरावतात. आई वडिलांच्या गरीबीमुळे अज्ञानामुळे त्यांना ओळखा देणेसुध्दा अवघड वाटते. घरची शेतीची कामे करण्यासाठी मुले तयार होत नाहीत.

......

## प्रकरण-६

### शिक्षणातील गळती कमी करण्यासाठी उपाययोजना

६.१ आदिवासींना त्यांचे सध्याचे औदासिन्य कमी करुन कार्यप्रवृत्त करणे, जीवनाबद्दल आकांक्षा निर्माण करणे, श्रमावर जगण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे, श्रमशक्तीतून उत्पादन शक्ती व भांडवल निर्मिती करणे, व आदिवासी शिकलेला माणूस तेथेच राहून बदलाची प्रक्रिया चालू राहील हे पहाणे इत्यादि गोष्टी निर्माण करील असे शिक्षण देणे योग्य होईल.

शिक्षण संस्थांचा एवढा पसारा वाढून सुध्दा आदिवासींची आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ६९ टक्के विद्यार्थी चौथी पर्यन्तच शाळा सोडून जातात. ८५ टक्के विद्यार्थी ७ वी पर्यन्त तर ८९ टक्के विद्यार्थी ८ वी पर्यंत शाळा सोडून जातात असे आढळून आले आहे.

६.२ आदिवासी भागात शिक्षणाबाबत जागृती करण्यासाठी, प्रचार माध्यमाचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची गरज आहे.

[१] आर्थिक बाब :- आदिवासी भागातील लोकांचे उपजीविकेचे मुख्य साधन म्हणजे शेती व शेतमजुरी होय. शेतीच्या हंगामात मुलांना शाळेत येता येत नाही. हे टाळण्यासाठी शाळेच्या सुट्ट्या परिसरातील कामाशी निगडित ठेवाव्यात.

आदिवासी समाज शाळेत जाणाऱ्या वयोगटातील मुलगा सुध्दा अर्थार्जन करुन देणारा म्हणून मानत असल्याने शाळेत जाऊन मुलाकडून मिळणारी रोजंदारी त्यांना मिळू शकत नाही. म्हणून व मुलांना शाळेत येण्यास उत्तेजन मिळावे यासाठी वर्षाअखेरी त्यांच्या हजेरी पटानुरुप व अभ्यासातील प्रगती पाहून काही आर्थिक फायदा पालकांना करुन दिल्यास त्याचा गळती कमी होण्यास फार मोठा परिणाम होईल असे वाटते. कारण पहाणी केल्याप्रमाणे ६६% मुलांनी आर्थिक कारणामुळे शाळा सोडली आहे असे दिसते.

[२] शिक्षणाबद्दल अनास्था कमी करणे :-

सक्तीचे शिक्षण हा कायदा योग्य त्या रीतीने राबविणे अत्यावश्यक आहे. म्हणजे शाळेतून गैरहजर राहणाऱ्या मुलांमध्ये पालकांमध्ये धाक उत्पन्न होऊन ती मुले शाळेत नियमित हजर राहतील. काही बाबतीत पालकांना दंडाचा धाक दाखवल्यास त्याचाही परिणाम गळतीवर होईल.

औद्योगिक नियमानुसार वयाच्या १४ वर्षापर्यंत कोणतेही काम करता येत नाही असे असताना बरीच आदिवासी मुले नोकरी करतात व गरीबांचा फायदा धंदेवाले करून घेतात. ह्यावर योग्य ते उपाय योजावे म्हणजे मुले शाळेत येतील. त्यासाठी त्यांना मधल्या सुट्टीत जेवण देणे, आश्रमशाळा काढून तेथे अशा मुलांना प्रवेश देणे, पालकांना आर्थिक मदत देणे इ. उपाय योजण्याची जरुरी आहे.

बरीच मुले घरातील लहान भावंडांना सांभाळण्यासाठी शाळा सोडतात अशा मुलांसाठी अंगणवाडी, बालवाडी, व प्राथमिक शाळा ह्या पध्दतीने शाळांचे जाळे विणल्यास मुलांना सांभाळण्यासाठी घरी राहणारी मुले शाळेत जातील.

प्रत्येक गावात शिक्षण समिती नेमून त्यावर गावातील सरपंच शिक्षणांत गोडी असणारे नागरिक व मुख्याध्यापक ह्यांचा समावेश असावा. त्यांच्यामार्फत पालकांशी संपर्क साधून वारंवार गैरहजर असणाऱ्या मुलांच्या पालकांना भेटी देऊन त्यांना शिक्षणाबाबत महत्व पटवून देणे आवश्यक आहे.

[३] जीवनपध्दती :-

आदिवासी लोकांचे जीवन स्वच्छंदी, मोकळे असल्याने शाळेच्या वेळा अभ्यासक्रमातील काही बाबींमध्ये त्यांचा समावेश असावा की जेणे करून शाळा बंदिस्त वाटू नये त्याचप्रमाणे अभ्यासक्रमात तेथे उपलब्ध असलेल्या गोष्टींचा उपयोग करून घ्यावा. की त्यामुळे त्यांच्या उपजत गुणांना वाव मिळेल व अभ्यासाचा कंटाळा येणार नाही.

[४] सामाजिक रुढी, मंत्र-तंत्र ह्यावर विश्वास कमी करणे :-

आदिवासी लोकांमध्ये काही लोक चांगले शिकलेले आहेत. त्या लोकांनी समाजामध्ये प्रचार करून ह्या गोष्टी कशा घातक आहेत हे समजावून देणे. त्याचप्रमाणे त्या भागात काम करणाऱ्या समाजसेवी संस्थांनी समाजसेवकांनी प्रचाराच्या माध्यमातून मंत्र तंत्रावरील विश्वास कमी करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

[५] अभ्यासक्रम :-

आदिवासी बालकांच्या आवडी निवडी व सहजप्रवृत्ती लक्षात घेऊन शिक्षण दिले जावे. घर व शाळा यामध्ये फरक वाटू नये. ह्यासाठी तेथे उपलब्ध असलेल्या वस्तूंमधून शिक्षण द्यावे. त्यामध्ये आरोग्यविषयक

सवयी निर्माण व्हाव्यात. त्यासाठी प्रयत्न करावा. त्यांना आवडणारी गाणी, गोष्टी व खेळ इत्यादिंचा समावेश असावा. त्याचबरोबर त्यांच्या भाषेत श्रवण, भाषण, वाचन व लेखन ह्याचा विकास करावा. गणिताचे मूलभूत ज्ञान देऊन त्यावर आधारित असलेल्या चार मूलभूतक्रिया करु शकतील असा अभ्यासक्रम असावा. अभ्यासक्रमामध्ये शेती व मूलोद्योगांचा समावेश असावा.

[६] शिकवण्याची पध्दत :-

आदिवासी भागामध्ये त्यांची भाषा वेगळी असल्याने शिक्षणामध्ये १ ते ४ इयत्तेपर्यन्त खालील पध्दतीचे शिक्षण असावे म्हणजे विद्यार्थी शाळेमध्ये आकर्षिले जातील व शिक्षण पूर्ण करतील.

इयत्ता १ ली मध्ये त्यांच्या घरी जी भाषा बोलली जाते त्या भाषेतच शिकविले पाहिजे. त्यामुळे मुलांना शिक्षकांबाबत भिती वाटणार नाही.

इयत्ता दुसरीमध्ये प्रथम काही दिवस घरची भाषा व प्रांतीक भाषा शिकवावी. दोन्ही भाषेतील समांतर शब्द समजावून सांगावे नंतर पुढे फक्त प्रांतीक भाषेतच शिक्षण द्यावे.

इयत्ता ३ री व ४ थी मध्ये फक्त प्रांतीक भाषेतच शिक्षण द्यावे.

भाषेप्रमाणेच गणित हा विषय सुध्दा आदिवासी भागात उपलब्ध असलेल्या वस्तू दाखवून त्याच्या आधाराने बेरजा, वजाबाक्या शिकवाव्यात. तो ज्या मापाने वजनाने बाजार करतो तीच मापे, वजने व स्टँडर्ड वजने, मापे ह्यांचा संबंध समजावून सांगून शिक्षण द्यावे.

शासनाच्या बाबत त्यांना उपलब्ध असलेल्या वस्तूंचा उपयोग करुन शिक्षण द्यावे. त्यामध्ये त्याचे आरोग्य, स्वच्छता, अन्न, वस्त्र व निवारा ह्यांचा समावेश असावा.

[७] परीक्षा पध्दती :-

मुलगा कच्चा असला तरी त्याला वरचे वर्गात घातले जाते. पण कच्चा असलेला अभ्यास पूर्ण करुन घेतला जात नाही. त्यासाठी सुट्टीच्या दिवसात कच्चा अभ्यास शिक्षकांनी पक्का करुन नंतर विद्यार्थ्याला वरचे वर्गात घालावे म्हणजे तो इतर मुलांबरोबर शाळेत शिकतो.

वर्षातून तीन वेळा चाचणी परीक्षा घेऊन त्याची प्रगती पाहून

त्याला नापासाचा शेरा न मारता अनौपचारिक परीक्षा घेऊन एकदम चौथीच्या परीक्षेला बसवावे. स्मरणशक्ती पहाणारी परीक्षा पध्दती बदलावी.

[८] शिक्षक :-

आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकाला त्या भागातील भाषेची, संस्कृतीची माहिती असणे, आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण द्यावे.

शक्यतो आदिवासी शिक्षक नेमावेत. परंतु त्यांच्याकडून मुलांची बौध्दिक पात्रता, भाषा शैली इतर समाजाबरोबर तयार होईल असे पहावे.

सेवाभावी ध्येयनिष्ठ असे शिक्षक नेमावेत, नुसते पगारापोटी येणारे शिक्षक फारसे उपयोगी पडत नाहीत. कारण ते सतत आदिवासी भागातून शहरी भागात बदली करण्यासाठी प्रयत्न करतात.

आदिवासी भागात शिक्षक नेमताना त्याला शिक्षा म्हणून न नेमता उलट त्याला बढती देऊन पाठवावे. म्हणजे तो शाळेचे काम चांगले करुन परत ५ वर्षांनी त्याला पाहिजे त्याठिकाणी बदली करावी म्हणजे तो कामात जास्त आपुलकी दाखवील.

प्रत्येक गावात शिक्षकाला घर द्यावे व त्यांनी तेथे राहण्याबाबत नियम करावेत.

त्यांना आदिवासी भागात काम केल्याबद्दल घरभत्ता, विशेष भत्ता, ग्रामीण भत्ता इत्यादि आर्थिक फायदे द्यावेत.

असे केल्याने शिक्षक आपणहून ५ वर्षांसाठी आदिवासी भागात हिरीरीने काम करतील व गळतीचे प्रमाण कमी होईल.

पट टिकविण्यासाठी व उपस्थिती चांगली राहण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन बक्षीस योजना चालू करावी.

[९] एक शिक्षकी शाळा :-

प्रत्येक प्राथमिक शाळेला बालवाडी असणे आवश्यक आहे. त्यामुळे बालवाडीचे शिक्षक १ ली व २ रीचे वर्ग घेऊ शकतील व ३ री, ४थी साठी वेगळे शिक्षक उपलब्ध होऊ शकतील.

अंगणवाडी बालवाडी ह्यातील शिक्षकांना कामाचे तास कमी

असल्याने त्यांचा उपयोग एक शिक्षकी शाळेतील १ली व २ रीच्या वर्गासाठी करता येईल व मुलांचे वर्गातील तास वाया न गेल्याने त्यांची प्रगती चांगली होऊन मुलांना शाळेची आवड उत्पन्न होईल.

[१०] शाळा व परिसर :-

प्रत्येक गावात शाळा गृहे बांधलेली असावीत. त्यांच्या भोवतालचा परिसर रम्य असावा. त्यात बाग, खेळण्याची साधने उपलब्ध असलेले पटांगण इत्यादि गोष्टी असाव्यात की ज्यामुळे मुले शाळेकडे आकर्षित होऊन त्यांना घरापेक्षा शाळेत राहणे आवडेल.

[११] सामाजिक समस्या :-

आदिवासी लोकांमधील सामाजिक रूढी, परंपरा, प्रथा हळूहळू बंद झाल्या पाहिजेत. त्यासाठी समाज सुधारक सामाजिक संस्थांनी प्रचार करूनही अशा प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांना कायद्याचे ज्ञान करून देणेसाठी पंचायत समितीतील विस्तार अधिकाऱ्यांचा सुध्दा उपयोग करून घ्यावा.

शिक्षणामुळे मुले कुटुंबाला दुरावतात हा समज दूर करण्यासाठी शिकलेल्या आदिवासी लोकांना गावातच किंवा त्या भागात नोकरी उद्योगधंदे उपलब्ध करून दिल्यास ते कुटुंबापासून दूर जाणार नाहीत व कुटुंबाबद्दल आस्था वाटून त्याचा इतर लोकांवर शिक्षणासाठी परिणाम होईल.

आदिवासी लोकांचा मुख्य उद्योगधंदा शेती असून त्याला पूरक धंदे गावात उपलब्ध करून दिले तर शिकलेली मुले तेथेच तो उद्योगधंदा सुरु करून स्वतःची जमीन करून उत्पन्न वाढवू शकेल व त्याचा परिणाम शिकण्यावर होऊन गळती कमी होईल.

[१२] इतर उपाय :-

१. शिक्षकांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांना शिक्षणाशिवाय इतर कामे देऊ नयेत. उदा. शाळा झाडणे, शाळेची घंटा देणे, शाळेत पाणी आणणे ह्यागोष्टी करण्यासाठी पार्टटाईम शिपाई नेमावा.
२. शिक्षक हा स्थानिक पुढाऱ्याचा सेवक आहे असे वाटता कामा नये.
३. शिक्षकांच्या निवासासाठी प्रत्येक गांवी सोय असावी.

४. जी मुले शाळेत दाखल होऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय असावी.

५. गुरुकूल पध्दतीने शिक्षण देणे.

६. विद्यार्थ्यांच्या रूचीप्रमाणे शिक्षण घेण्याची सवलत, शाळेच्या सोयीस्कर वेळा व शिकता शिकता अर्थार्जन करण्याची सोय करणे.

आदिवासी भागात शैक्षणिक कार्य करणा-या सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी व शिक्षणाबाबत आस्था असणारे काही लोकांनी समक्ष भेटून त्याचे शिक्षणातील गळतीबाबतचे मत अजमावण्यासाठी एक प्रश्नावली तयार करून त्यामध्ये त्यांचे विचार गोळा केले आहेत ते खालीलप्रमाणे:-

* कातकरी, वारली व ठाकूर या जातीतील लोक पोट भरण्यासाठी परगांवी जातात. त्यामुळे मुले शाळेत नियमीत येऊ शकत नाहीत व त्यांच्यात शाळेची गोडी उत्पन्न होत नाही. शेवटी अशा मुलींची शाळेतून गळती होते.

* अल्प वयात मुलामुलींची लग्ने होतात. त्यासाठी धनिकांकडून कर्जाऊ पैसे घेतात व त्यासाठी मुलांना कामासाठी गुरे राखणे,साठी ठेवले जाते. त्यामुळे आपोआप शाळा सुटली जाते.

* एक शिक्षकी शाळा अध्यापनाच्या बाबतीत प्रभावी पडत नाहीत. त्यामुळे मुलांना शिक्षणात गोडी लागत नाही व शेवटी शाळा सोडण्यात येते.

* आदिवासी समाजात आर्थिक बाबतीत कोणतेच स्थैर्य नसल्याने तो शिक्षणाबाबत सुविधांचा उपयोग घेऊ शकत नाही. त्यामुळे मुलांची शाळेतून गळती होते.

* ह्या समाजातील दरी कमी होण्यासाठी पुढारलेले व सुशिक्षीत समाजाने सामाजिक कर्तव्ये पार पाडली नाही.

* शासनाने राष्ट्रीय विचारांची जबरदस्त पकड, आर्थिक सोयींची नियोजनबध्द बांधणी व सामाजिक बांधीलकीची भावना या गोष्टी जोपासल्या नाहीत. आज समाजात राष्ट्रीय भावनाच राहिली नाही. त्यामुळे गळती थांबण्यासाठी जालीम उपाय योजावे लागतील. एक शिक्षकी शाळा बंद करून बहुशिक्षकी शाळा सुरु कराव्यात कारण नेमून दिलेल्या तासिकाप्रमाणे अभ्यास एक शिक्षकास घेत येत नाही. त्यामुळे मुले कच्ची राहून त्याचा पर्याय गळती मध्ये होतो.

.....

परिशिष्ट [१]

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शाळेतील गळतीचा मूल्यमापन अभ्यास

[१९८६]

प्रपत्र- १

कुटुंब-पत्रक

## चौक -१ ओळख तपशील·

[१] राज्य .................. [२] जिल्हा ...............

[३] तालुका/पंचायत समिती ........................

[४] गांव ..................................

[५] पाडा/वाडी/तांडा .......................

[६] अ] पाड्याची/वाड्याची/तांड्याची लोकसंख्या ...............

ब] पाड्यापासून/वाड्यापासून/तांड्यापासून जवळच्या प्राथमिक शाळेचे अंतर ....................

## चौक - २ कुटुंबाविषयी माहिती·

[१] कुटुंब प्रमुखाचे नांव :

[२] धर्म :

[३] अ·जात/जमात :

ब·पोटजात/पोट जमात :

[४] कुटुंबातील एकूण व्यक्ती [ ] पुरुष [ ] स्त्री [ ]

[५] कुटुंबाचा व्यवसाय : प्रमुख .................

दुय्यम .................

[६] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे [सन १९८६-८७] :

शेरा :- हे विचारताना त्यांच्याकडे असलेली जमीन, पशुधन, नोकरी करणारी माणसे ह्या गोष्टींचा विचार करुन अंदाजित सरासरी उत्पन्न काढावे·

[७] ६ ते १४ वयोगटातील मुलांची वर्गवारी : मुले [ ] मुली [ ]

अ] १· शाळेत जाणारी

२· शाळेत न जाणारी

··२/·

[७] ब] शाळेत न जाणा-या मुला-मुलींचा तपशील [६ ते १४ वर्षां-पर्यंतची मुले ]

| अ·न· | नांव | मुलगा/ मुलगी | शाळा सोडलेवेळी वय | कोणत्या वर्गात शाळा सोडली ? | शाळा सोडल्याचे कारण [पालकां-च्या सूचना देणे] | सध्याचा कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| ·१· | ·२· | ·३· | ·४· | ·५· | ·६· | ·७· |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

[८] आपल्या मुलांना पुन्हा शाळेत पाठविण्यासाठी कोणत्या सोयी उपलब्ध कराव्यात असे आपणाला वाटते ?

[१] ------------------------------------------------

[२] ------------------------------------------------

[३] ------------------------------------------------

[४] ------------------------------------------------

[५] ------------------------------------------------

[९] अ· कुटुंबातील परंपरागत व्यवसाय :

ब· पालकांच्या सद्य व्यवसायामुळे मुलांच्या शाळेत जाण्यावर/ नापास होण्यावर काय परिणाम होतो·? :

[१०] इतर अभिप्राय [शिक्षणाबाबत] :

स्वाक्षरी

अधिका-याचे नांव-

हुद्दा

दिनांक -

# परिशिष्ट [२]

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील गळतीचा

## मूल्यमापन अभ्यास

## प्रपत्र-२

## प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या/सामाजिक कार्यकर्त्यांच्या अभिप्रायार्थ

## प्रश्नावली

[१] प्रशासकीय अधिकाऱ्याचे/सामाजिक कार्यकर्त्याचे नांव :

हुद्दा :

पत्ता :

[२] पंचायत समितीमध्ये किती वर्षे काम करीत आहात? :

[३] मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील गळतीबाबत आपली कारणमिमांसा :

[४] सदर गळती थांबविण्यासाठी कोणती उपाययोजना करावी, असे आपणास वाटते ? :

हस्ताक्षर

# परिशिष्ट [३]

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळती

## मूल्यमापन अभ्यास १९८६-८७

## गांव माहिती प्रपत्र - ३

### चौक-१ ओळख

[अ] १. जिल्हा : ______________________

२. तालुका/पंचायत समिती : ______________________

३. गांव : ______________________

४. पाड्याची/वाड्याची तांड्याची संख्या : ______________________

[ब] गांवातील प्राथमिक व इतर सोयी [ ] गांवात | नसल्यास गांवापासून अंतर

१. पोष्ट/टेलीग्राम : ______________________

२. दूरध्वनी सेवा : ______________________

३. पिठाची गिरणी : ______________________

४. किराणा माल दुकाने : ______________________

५. पिण्याची पाण्याची सोय कशी ? : ______________________

१. नळाने : ______________________

२. विहिर : ______________________

३. तळी/ओढा : ______________________

६. गांवात रस्त्याची सोय — एस.टी.वाहतूक होये/नाही

बारमाही - होय/नाही

हंगामी - होय/नाही.

७. इतर :

## चौक -२ भौगोलिक क्षेत्र/लोकसंख्या माहिती

[१] एकूण भौगोलिक क्षेत्र : हेक्टर्स ..................

[२] गावाची एकूण लोकसंख्या :

| | अनु.जमात | अनु.जाती | विमुक्त व भटक्या जमाती | इतर मागास वर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | | | | | |
| स्त्री | | | | | |
| एकूण | | | | | |

[३] कुटुंबाची संख्या - एकूण कुटुंबे ....................

| | अनु.जमात | अनु.जाती | विमुक्त व भटक्या जमाती | इतर मागासवर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. शेतकरी | | | | | |
| २. शेतमजूर | | | | | |
| ३. जंगलकामगार | | | | | |
| ४. इतर | | | | | |
| एकूण | | | | | |

[४] गावाचे साक्षरतेचे प्रमाण :

## चौक- ३ गांवातील शैक्षणिक संस्थांची माहिती

[३०.९.१९८६]

| अ.नं. | मालकीनुरूप संस्थाप्रकार | संस्थेचे नांव | वर्ग | वर्गीकरण |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद | | | |
| २. | स्वंयसेवी संस्था [अनुदानित] | | | |
| ३. | छाजगी [विनर अनुदानित] | | | |
| ४. | प्रौढ वर्ग | | | |

## चौक-४ विद्यार्थी हजेरी पट

[सर्व विद्यार्थी]

[३०•९•८५]

| अ•नं• | संस्था प्रकारानुरूप | | विद्यार्थी संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु• जाती | अनु• जमाती | विमुक्त व भटक्या जमाती | इतर मागास वर्ग | इतर | एकूण |
| •१• | •२• | | •३• | •४• | •५• | •६• | •७• | •८• |
| १• | पूर्व प्राथमिक | मुले – | | | | | | |
| | | मुली – | | | | | | |
| | | एकूण – | | | | | | |
| २• | प्राथमिक | मुले – | | | | | | |
| | | मुली – | | | | | | |
| | | एकूण – | | | | | | |
| ३• | माध्यमिक | मुले – | | | | | | |
| | | मुली – | | | | | | |
| | | एकूण – | | | | | | |
| ४• | उच्च माध्यमिक | मुले – | | | | | | |
| | | मुली – | | | | | | |
| | | एकूण – | | | | | | |
| ५• | इतर | मुले – | | | | | | |
| | | मुली – | | | | | | |
| | | एकूण – | | | | | | |

## चौक-५ इयत्ता निहाय विद्यार्थी पासांचे प्रमाण

[सर्व विद्यार्थी]

| अनु• | संस्था प्रकार | वर्ग | एकूण | पास | नापास | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १• | | | | |
| | | २• | | | | |
| | | ३ | | | | |
| | | ४ | | | | |
| | | ५ | | | | |
| | | ६ | | | | |
| | | ७ | | | | |
| | | ८ | | | | |
| | | ९ | | | | |
| | | १० | | | | |

[अ] <u>शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांची वर्गवार संख्या :</u>

| वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

[ब] शाळा सोडल्याची सर्वसाधारण कारणे.

१. ____________________

२. ____________________

३. ____________________

४. ____________________

५. ____________________

६. ____________________

## चौक-६ शिक्षकांविषयी माहिती

[३०.९.८५]

| अ.नं. | वर्ग | एकूण शिक्षक मंजूर | एकूण शिक्षक प्रत्यक्ष | प्रशिक्षित | अप्रशिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| .१. | .२. | .३. | .४. | .५. | .६. |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

## चौक- ७ शाळा गृहाबाबत माहिती

| अ.नं. | संस्था प्रकार | स्वत:च्या इमारतीत [वर्ग] | स्वत:ची इमारत नसलेल्या [वर्ग] | एकूण [वर्ग] |
|---|---|---|---|---|
| .१. | .२. | .३. | .४. | .५. |
| १. | प्राथमिक | | | |
| २. | माध्यमिक | | | |
| ३. | इतर | | | |

[अ] शाळा एक शिक्षकी किंवा कसे ? होय/नाही

[ब] सध्या शाळा कोठे भरते ?

[क] कोणते वर्ग तेथे भरतात ?

[ड] शाळा गृहाचे बांधकाम

१] चालू :- ....................

२] पूर्ण :- ....................

चौक-८ शाळेतील सुविधा

| अ.नं. | प्रकार | होय/नाही |
|---|---|---|
| १. | क्रिडांगण | : ____________________ |
| २. | पिण्याचे पाणी | : ____________________ |
| ३. | विजेची सोय | : ____________________ |
| ४. | स्वच्छता गृहे | : ____________________ |
| ५. | फळा | : ____________________ |
| ६. | ग्रंथालय | : ____________________ |

स्वाक्षरी -

हुद्दा -

# परिशिष्ट [४]

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळती

## मूल्यमापन अभ्यास

[१९८६-८७]

## तालुका सांख्यिकी माहिती प्रपत्र - ४

### चौक - १ ओळख

१] राज्य .................... तालुका/पंचायत समिती ...........

२] जिल्हा ....................

कोणत्या लोकसंख्या गटासाठी निवड केली आहे ?

आदिवासी

अनुसूचित जाती

इतर

### चौक-२ भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या

१] एकूण तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ............ [अ] एकूण गांवे ......

[ब] शहरे ..........

[ समाज कल्याण अधिकारी ]

२] एकूण लोकसंख्या ........

| | एकूण | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| अ. अनुसूचित जमाती | | | |
| ब. अनुसूचित जाती | | | |
| क. भटक्या/विमुक्त | | | |
| ड. इतर मागास | | | |
| इ. इतर | | | |
| फ. साक्षरतेचे प्रमाण [१९८१ जनगणनेनुसार] | | | |

[ समाज कल्याण अधिकारी ]

३] व्यवसायानुरूप लोकसंख्या/कुटुंबाची विभागणी :-

अ. शेतकरी ____________________

ब. शेतमजूर ____________________

क. जंगल कामगार ____________________

ड. इतर ____________________

इ. एकूण ____________________

कुटुंबांची संख्या :-

अ. अनुसूचित जमाती ____________________

ब. अनुसूचित जाती ____________________

क. भटक्या विमुक्त ____________________

ड. इतर मागास ____________________

इ. इतर ____________________

## चौक- ३ शैक्षणिक संस्थांची माहिती

| अ.क्र. | प्रकारानुरूप वर्गीकरण | तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | शासकीय | खाजगी |
| .१. | .२. | .३. | .४. | .५. |
| १] | पूर्व प्राथमिक | | | |
| २] | प्राथमिक | | | |
| ३] | माध्यमिक | | | |
| ४] | उच्च माध्यमिक | | | |
| ५] | महाविद्यालय | | | |
| ६] | तांत्रिक | | | |
| ७] | इतर [खुलासा] | | | |

एक शिक्षकी शाळा किती आहेत ?

चौक-४ विद्यार्थ्यांचा हजेरी पट [एकूण विद्यार्थी]

| अ.क्र. | प्रकारानुरूप वर्गीकरण | | तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | शासकीय | खाजगी |
| .१. | .२. | | .३. | .४. | .५. |
| १] | पूर्व प्राथमिक | मुले - | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| २] | प्राथमिक | मुले - | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ३] | माध्यमिक [तंत्रशाळेसह] | मुले - | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ४] | उच्च माध्यमिक | मुले - | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ५] | अध्यापक विद्यालय | मुले- | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ६] | अध्यापक महाविद्यालय | मुले- | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ७] | महाविद्यालय | मुले | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |
| ८] | तंत्रनिकेतन | मुले - | | | |
| | | मुली- | | | |
| | | एकूण- | | | |

## चौक- ५ इयत्तावार विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण प्रमाण

[शैक्षणिक वर्ष- १९८५-८६]

| अ.नं. | शाळा प्रकार | | तपशील | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | | पास झालेली | | नापास झालेली | | टक्केवारी |
| | | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| .१. | .२. | | .३. | .४. | .५. | .६. | .७. | .८. | .९. |
| १] | प्राथमिक | १. | | | | | | | |
| | | २. | | | | | | | |
| | | ३. | | | | | | | |
| | | ४. | | | | | | | |
| २] | माध्यमिक | ५. | | | | | | | |
| | | ६. | | | | | | | |
| | | ७. | | | | | | | |
| | | ८. | | | | | | | |
| | | ९. | | | | | | | |
| | | १०. | | | | | | | |

## चौक-६ शिक्षकांविषयी माहिती

| अ.नं. | संस्था प्रकार | एकूण शिक्षक | | प्रशिक्षित | अप्रशिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | प्रत्यक्ष | | |
| .१. | .२. | .३. | .४. | .५. | .६. |
| १. | पूर्व प्राथमिक | | | | |
| २. | प्राथमिक | | | | |
| ३. | माध्यमिक | | | | |
| ४. | उच्च माध्यमिक | | | | |
| ५. | इतर [खुलासा करणे] | | | | |

## चौक-७ शाळागृहाबाबत माहिती

| अ.नं. | शाळाप्रकार | स्वत:च्या इमारतीत असलेल्या | स्वत:च्या इमारतीत नसलेल्या | एकूण शाळा |
|---|---|---|---|---|
| .१. | .२. | .३. | .४. | .५. |
| १. | प्राथमिक | | | |
| २. | माध्यमिक | | | |
| ३. | उच्च माध्यमिक | | | |
| ४. | महाविद्यालय | | | |
| ५. | तांत्रिक | | | |
| ६. | इतर (खुलासा करणे) | | | |

दिनांक :

स्वाक्षरी :

हुद्दा :